राज्य कुटुंब कार्यालय, पुणे
महाराष्ट्र राज्य

अतिरिक्त् संचालक दूरध्वनी क्रमांक (वै) - कार्यालय दूरध्वनी क्र.-	२६०५८९९६ (वै) २६०५८७३९ (का) २६०५८१३९ (का) २६०५८४७६ (का)	अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजाबहादूर मिल रोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे-१. Email ID : fwpune.est@gmqil.com
आरोग्य सेवा		जा.क्र.राकुकका/आस्था/नागरिकांची सनद/कक्ष-२क/न.क्र.७५/ ४६५८८-९ /२०२१ दिनांक :- २२/०५/२०२१

06

प्रति,
सहसंचालक आरोग्य सेवा संचालनालय,
(अर्थ व प्रशासन) आरोग्य भवन,
मुंबई-४०० ००१.

विषय :- नागरिकांची सनद प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ :- आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र क्र.आसेसं/
नागरिकांची सनद/कार्यवाही/६१७/कक्ष-५/टे-९/२१,
दिनांक २५/०३/२०२१.

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत नागरिकांना पुरविल्या जाणा-या सेवाची माहिती इंग्रजी व मराठीमध्ये तयार करण्यात आलेली असून सदरची माहिती दोन प्रतीत सादर करण्यात येत असून आपल्या मार्फत मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना सादर करण्यात यावी.

(डॉ.अर्चना पाटील)
अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा,
कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.

प्रत सविनय सादर :- मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
आगाऊ प्रत सविनय सादर :- मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई -४०० ००१.
प्रत :- सहाय्यक संचालक आरोग्य सेवा, (एम.आय.एस कक्ष) मुंबई.

महाराष्ट्र शासन

नागरिकांची सनद

अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण,
माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.

नागरिकांची सनद

१. प्रस्तावना

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे हा विभाग मंत्रालयातील सार्वजनिक आरोग्य विभाग या प्रशासकीय विभागातील एक महत्वाचा विभाग असून त्यामध्ये अतिरिक्त संचालक, सह संचालक, उपसंचालक (कुटुंब कल्याण), उपसंचालक (विलटो), राज्य लोक संख्या शास्त्रज्ञ, संशोधन अधिकारी, सहायक संचालक, मुख्य प्रशासकीय अधिकारी, लेखाधिकारी, भांडार अधिकारी, भांडार पडताळणी अधिकारी, सांख्यिकी अधिकारी यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासन बदल या विनियोजन शासकीय कर्तव्य पार पाडताना होणारा विलंब प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार "राज्य कुटुंब कल्याण कार्यालय" हे कार्यालय नागरिकांची सनद प्रसिध्द करीत आहे. या विभागाशी संबंधित असणा-या सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक, सन्मानपूर्वक नागरिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी हा विभाग बांधिल राहिल.

२. राज्य कुटुंब कल्याण कार्यालयाची रचना

अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे-१ हे राज्यस्तरीय कार्यालय असून सदर कार्यालयामध्ये एकूण २० कक्षामध्ये या विभागाकडून सर्व विषयवार विभागणी करण्यात आली आहे. सोबत परिशिष्ट-२ जोडले आहे.

३. कार्यपूर्तीचे वेळापत्रक

कार्यपूर्तीचे वेळापत्रक परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेले आहे. (सोबत प्रत)

४. नियम व शासन निर्णय - निरंक

५. (अ) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकारण

कार्यपूर्तीस होणारा विलंब व अन्य काही गा-हाणी असल्यास त्यासंबंधी अधिका-याकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिका-याची राहील. यानंतर ही नागरीकाचे समाधान न झाल्यास मा.अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण, पुणे यांचे कडे संबंधितास तक्रार करता येईल.

(ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्तेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा राज्य कुटुंब कल्याण विभाग, पुणे यांचेकडून घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल.

(क) जनसामान्यांकडून सूचना

नागरिकांची सनद सर्व सामान्य नागरिकांच्या माहितीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांच्या अधिनस्त येणा-या सेवा उपभोगणा-या नागरिकांना आपला हक्क मांडण्यासाठी हे कार्यालय नेहमी सहकार्य करेल.

(६) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे हा विभाग कटिबध्द आहे. या विभागाच्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्य भावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्यात येईल. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्वक वागणूक देण्याची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांची राहील.

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे

नागरिकांची सनद - कार्यपूर्तीचे वेळापत्रक

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
१.	जननी सुरक्षा योजना	अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व दारिद्रय रेषेखालील सर्व गर्भवती महिला या योजनेसाठी लाभार्थी म्हणून पात्र आहेत. ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थीची प्रसूती घरी झाल्यास ५००/- रुपये, शहरी भागातील लाभार्थींची प्रसूती शासकिय किंवा शासन मान्य मानांकित आरोग्य संस्थेत झाल्यास ६००/- रुपये, ग्रामीण भागातील लाभार्थींची प्रसूती शासकिय किंवा शासन मान्य मानांकित आरोग्य संस्थेत झाल्यास ७००/- रुपये, तर सिझेरिअन शस्त्रक्रिया झाल्यास लाभार्थीस रु. १५००/- चा लाभ देय आहे. सदर योजनेचा लाभ हा लाभार्थ्याच्या बँक खात्यावर डीबीटी, पीएफएमएसद्वारे धनादेशाद्वारे देण्यात येतो.	प्रसूती सेवा उपलब्ध असलेल्या सर्व शासकिय आरोग्य संस्था व शासन मानांकित खाजगी आरोग्य संस्था	१) रहिवासी दाखला २) जातीचा दाखला ३) उत्पन्नाचा दाखला	प्रसूतीनंतर ७ दिवसांच्या आत	संबंधित कार्यक्षेत्रातील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी	<u>राज्यस्तरावर-</u> मा. अतिरिक्त संचालक, (कुक), आरोग्य सेवा, पुणे <u>मंडळस्तरावर-</u> उपसंचालक आरोग्य सेवा विभागीय मंडळ <u>जिल्हास्तरावर-</u> मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, <u>महानगरपालिका स्तरावर-</u> आयुक्त (मनपा) <u>तालुकास्तरावर-</u> तालुका विकास अधिकारी

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
२.	**जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम**	या योजने अंतर्गत गरोदर मातेस व प्रसूती पश्चात ४२ दिवसा पर्यंत पुढील प्रमाणे मोफत सुविधा देण्यात येतात. प्रसूती, सिझेरीयन शस्त्रक्रिया, प्रसूती संदर्भातील, गरोदरपणातील व प्रसूती पश्चात आवश्यक औषधे व साहित्य, प्रयोगशाळेतील तपासण्या, प्रसूती पश्चात आहार (स्वाभाविक प्रसूती - ३ दिवस, सिझेरीयन प्रसूती — ७ दिवस) मोफत रक्तसंक्रमण, घरापासून आरोग्य संस्थेपर्यंत, एका आरोग्य संस्थेतून दुस-या आरोग्य संस्थेत तसेच आरोग्य संस्थेतून घरापर्यंत वाहतूक व्यवस्था. या योजने अंतर्गत एका वर्षापर्यंतच्या आजारी बालकास पुढील प्रमाणे मोफत सुविधा देण्यात येतात. उपचारासाठी आवश्यक औषधे व साहित्य, प्रयोगशाळेतील तपासण्या, मोफत रक्तसंक्रमण, घरापासून आरोग्य संस्थेपर्यंत, एका आरोग्य संस्थेतून दुस-या आरोग्य संस्थेत तसेच आरोग्य संस्थेतून घरापर्यंत वाहतूक व्यवस्था.	संबंधीत शासकिय आरोग्य संस्था	काही नाही	गरोदरपणाच्या काळात, प्रसूती दरम्यान, प्रसूतीनंतर ४२ दिवसांपर्यंत व १ वर्षे वयापर्यंतच्या आजारी बालकास	संबंधीत वैद्यकीय अधिकारी	<u>राज्यस्तरावर —</u> राज्य आरोग्य सोसायटी संबधित तक्रार निवारण अधिकारी <u>जिल्हास्तरावर -</u> जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील प्रशासकीय अधिकारी

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
३.	राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम	अंगणवाडीस्तरावर ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी. शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित शाळेतील ६ ते १८ वर्षे वयोगटातील विदयार्थ्यांची व शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील १८ वर्षे वयापर्यंतच्या विदयार्थ्यांची आरोग्य तपासणी	अंगणवाडी. शासकिय, निमशासकिय व शासन अनुदानित शाळांमधील व शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील आरोग्य तपासणी शिबीरे	काही नाही	तपासणी शिबीरा दरम्यान	राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत स्थापन केलेल्या पथकामार्फत	जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय
४.	(अ) बाल उपचार केंद्रें	गंभीर व तीव्र आजारी कुपोषित बालकांना १४ दिवसांसाठी बाल उपचार केंद्रामध्ये दाखल करुन वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत तपासणी करुन उपचार देण्यात येतात. दाखल करण्यात आलेल्या बालकांना व मातांना उपचारात्मक आहार देण्यात येतो. मातांना बुडीत मंजुरी देण्यात येते. तसेच आहाराबाबतचे प्रशिक्षण देण्यात येते.	<u>ग्रामिण रुग्णालय</u> - १.धानोरा (गडचिरोली), २.आष्टी (गडचिरोली), ३.इगतपूरी (नाशिक) ४. त्रंबक (नाशिक) ५.पेठ (नाशिक) ६.ब्रम्हपूरी (चंद्रपूर) ७.कोरपना (चंद्रपूर) ८.मुरबाड (ठाणे) ९.मोरगाव अर्जुनी (गोंदिया) १०.साकरी (धुळे) <u>उपजिल्हा रुग्णालय</u> - ११.आरमोरी (गडचिरोली) १२.कुरखेडा (गडचिरोली) १३.सिरोंचा (गडचिरोली) १४.मुल (चंद्रपुर) १५.वरोरा	काही नाही	बाल उपचार केंद्र शिबीरा दरम्यान	संबंधित कार्यक्षेत्रातील वैद्यकीय अधिकारी,	जिल्हा शल्य चिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी

			(चंद्रपुर) १६.अक्लकुवा (नंदुरबार) १७.नवापुर (नंदुरबार) १८.शहापूर (ठाणे) १९.भिंवडी (ठाणे) २०.तिरोडा (गोंदिया) २१.दारवा (यवतमाळ) २२.पुसद (यवतमाळ) २३.मंचर (पुणे) २४.वाडा (पालघर) **सामान्य रुग्णालय -** २५.मालेगाव(नाशिक)				
	(ब) पोषण पुनर्वसन केंद्र	राज्यातील सर्व जिल्हयामध्ये सदर योजना कार्यरत असून गंभीर कुपोषित बालकांना पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये दाखल करुन वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत तपासणी करून उपचार देण्यात येतात. बालकांना उपचारात्मक आहार दिला जातो. मातेस बुडीत मजुरी व दोन वेळेचा आहार तसेच आहाराबाबतचे प्रशिक्षण देण्यात येते.	<u>जिल्हा रुग्णालये-</u> १. गडचिरोली, २.चंद्रपूर, ३. वर्धा, ४. भंडारा, ५. अमरावती, ६. वाशिम, ७. बुलढाणा, ८.नाशिक, ९. अहमदनगर, १०. जळगांव, ११.नंदुरबार, १२. ठाणे, १३. रायगड, १४. पुणे (औंघ), १५.सातारा, १६.हिंगोली, १७. जालना, १८. परभणी, १९. औरंगाबाद, २०. बीड, २१. रत्नागिरी, २२.सिंधुदुर्ग <u>उपजिल्हा रुग्णालय-</u> २३. अहेरी (गडचिरोली), २४. धारणी (अमरावती), २५. पांढरकवडा (यवतमाळ), २६. धडगांव (नंदूरबार), २७. तळोदा (नंदूरबार), २८. शिरपूर (धुळे), २९. जव्हार	काही नाही	बालक पोषण पुनर्वसन केंद्रात दाखल असेपर्यंत	बालरोगतज्ञ, वैद्यकीय अधिकारी, आहारतज्ञ व परिचारिका	जिल्हा शल्य चिकित्सक

			(पालघर) ३०. डहाणू (पालघर), ३१. कासा (पालघर), ३२. पंढरपूर (सोलापूर), ३३. गडहिंग्लज (कोल्हापूर) ग्रामीण रुग्णालय - ३४. चिखलदरा (अमरावती), ३५. चुरणी (अमरावती), ३६. मोलगी (नंदूरबार) ३७. मोखाडा (पालघर), ३८. विक्रमगड (पालघर) स्त्री रुग्णालय - ३९.गोंदिया, ४०.डागा, ४१.नांदेड, ४२.अकोला, ४३.लातूर				

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
५.	विषेश नवजात काळजी कक्ष (एसएनसीयु)	राज्यातील १७ जिल्हा रुग्णालये, ११ स्त्री रुग्णालये ८ उपजिल्हा रुग्णालय व २ सामान्य रुग्णालये, १ पीव्हीपीजीएच सांगली स्तरावर गंभीर आजारी नवजात बालकाच्या उपचारासाठी **विषेश नवजात काळजी कक्ष (एसएनसीयु)** कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. या दाखल नवजात बालकांच्या उपचारासाठी २४ तास बालरोगतज्ञ, वैद्यकिय अधिकारी, स्टाफ नर्स आणि मदतनीस (सफाईकामगार) कार्यरत असतात.	<u>जिल्हा रुग्णालये</u>- १.नाशिक, २.जळगाव, ३.अहमदनगर, ४.नंदूरबार, ५.आलीबाग-रागड, ६.रत्नागिरी, ७.ठाणे, ८.पुणे, ९.सातारा, १०.सिंधुदुर्ग, ११.बीड, १२.हिंगोली, १३.वर्धा, १४.भंडारा, १५.चंद्रपूर, १६.बुलढाणा, १७.वाशिम <u>सामान्य रुग्णालय</u>- १८.मालेगाव, १९.खामगाव <u>स्त्री रुग्णालय</u> - २०.एमएच उल्हासनगर, २१.नांदेड, २२.परभणी, २३.डागा नागपुर, २४.अकोला, २५.लातूर, २६.उस्मानाबाद, २७.जालना, २८.गडचिरोली, २९.गोदिया, ३०.अमरावती, <u>उपजिल्हा रुग्णालय</u>- ३१.भिवंडी, ३२.सीएच उल्हासनगर, ३३.जव्हार, ३४.पंढरपुर, ३५.गडहिंग्लज, ३६.कराड, ३७.धारणी, ३८.अहेरी व ३९. शा.वै.महा.मिरज सांगली अंतर्गत पीव्हीपी सामान्य रुग्णालय,सांगली	काही नाही	विषेश नवजात काळजी कक्षात (एसएनसीयु) दाखल असे पर्यंत	बालरोगतज्ञ, वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स आणि मदतनीस (सफाईकामगार)	जिल्हा शल्य चिकित्सक

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
	नवजात शिशु स्थिरकरण कक्ष (एनबीएसयु)	स्थिरकरण कक्ष हे आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (New Born Stabilization Unit — (NBSU) आहे, जे पेरीफेरीतील नवजात शिशुंना सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी स्थापित करण्यात आले आहेत.	एनबीएसयु याची स्थापना पहिली संदर्भ सेवा कक्ष आणि गावपातळीवरील १९३ उपजिल्हा रुग्णालयांमध्ये करण्यात आली आहे.	काही नाही	नवजात शिशु स्थिरकरण कक्ष (एनबीएसयु) दाखल असे पर्यंत	बालरोगतज्ञ/ वैद्यकीय अधिकारी आणि स्टाफ नर्स	जिल्हा शल्य चिकित्सक

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
५.	नियमित लसीकरण कार्यक्रम	गरोदर माता व ० ते १६ वर्षे वयोगटातील लाभार्थी. या योजने-अंतर्गत केंद्रशासनाच्या राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकानुसार लाभार्थींना क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ, हिपॅटायटिस बी, गोवर, रुबेला, हिमोफिलीस् इन्ल्युएजा टाईप बी तसेच गरोदर मातांना धनुर्वात या संसर्गजन्य रोगांविरुध्द प्रतिकार शक्ती निर्माण करण्यासाठी लस देण्यात येते. यवतमाळ, वाशिम, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, लातुर, बीड आणि अमरावती जिल्हा व अमरावती महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जॅपनीज् एन्केफेलाईटीस या आजारासाठी लस देण्यात येते.	लसीकरणे सत्रे आयोजित करण्यात येणा-या सर्व शासकिय, निमशासकिय, खाजगी मानांकित आरोग्य संस्था, अंगणवाडया व आवश्यकतेनुसार बाहय सत्राच्या ठिकाणी.	काही नाही	राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकाप्रमाणे दिलेल्या विहीत वयोगटात	सबंधित वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी	जिल्हा शल्य चिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी/ वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
६.	राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम	• संतती नियमनांच्या कायमच्या पध्दतीमध्ये स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया व पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया , प्रसुती पश्चत कुटुंब नियोजन स्त्री शस्त्रक्रिया • पाळणा लांबविण्यासाठी तात्पुरत्या पध्दतीमध्ये निरोध, गर्भनिरोधक गोळया वाटप, सेंटक्रोमॅन विकली पिल्स व तांबी बसविणे, प्रसुती पश्चत तांबी बसविणे या सेवा.	शासकीय, निम शासकीय आरोग्य संस्था व शासन मानांकित खाजगी रुग्णालये.	कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर आर्थिक मोबदला घेण्यासाठी १) जातीचा दाखला २) उत्पन्नाचा दाखला ३) बँक खाते संबंधीत सर्व कागदपत्रे.	शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यापूर्वी	कार्यक्षेत्रातील संबंधीत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी	जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा , पुणे
		• केंद्र शासनाच्या अंतरा कार्यक्रमातर्गत इंजेकशन व्दारे देण्यात येणारे गर्भ निरोधक साधन एमपीए	जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, वैदयकिय महाविदयालय रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय,ग्रामीण रुग्णालय, निवडक प्राथमिक आरोग्य केंद्रे, महानगरपालिका.	काही नाही.	लाभार्थीची वैदयकीय तपासणीनंतर त्वरीत	स्त्री रोग व प्रसुती तज्ञ, स्टार्फ नर्स , प्रशिक्षत वैदयकीय अधिकारी	जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, कार्यकारी आरोग्य अधिकारी- बृहन्मुंबई मनपा, वैदयकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा, पुणे

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
७.	कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजना	कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर घडलेल्या मृत्यू, असफल व गुंतागुंत प्रकरणी एनएचएम अंतर्गत नुकसान भरपाई देण्यासाठी अनुदान वितरीत केले जाते. तसेच सदर योजना ही शासन निर्णय क्रमांक २०१३/प्र.क्र. ७४/कु.क., सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, दि.०९.०५. २०१३ अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक कुनिश २०१६/प्र.क्र.१८०/ कु.क., सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, दि.१८.७.२०१६ अन्वये वरील प्रकरणी लाभार्थीस देय असलेली नुकसान भरपाईची रक्कम राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अनुदानातून खालील १) रुग्णालयात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेशी संबंध लावण्याजोगे	जिल्हा आरोग्य अधिकारी	१) कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर मृत्यू - संबंधीत नोडल अधिकारी यांनी साक्षांकित केलेले क्लेम फॉर्म, संमतीपत्रक, शस्त्रक्रिया प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र, जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीची निरीक्षणे व अहवाल, नोडल अधिकारी यांनी साक्षांकित केलेले केस पेपर यामध्ये शस्त्रक्रिया पध्दत, शस्त्रक्रिया प्रश्चात् तपासणी व उपचार, रुग्णाला डिस्चार्ज दिला असल्यास तसा स्पष्ट	९० दिवस	जिल्हा आरोग्य अधिकारी	उपसंचालक, आरोग्य सेवा (मंडळ)

		कारणामुळे मृत्यू झाल्यास किंवा प्रमाणे दिली जाते.रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर सात दिवसांच्या आत मृत्यू झाल्यास - रक्कम रु.२,००,०००/- २) रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्याच्या तारखेपासून ८ ते३० दिवसांच्या दरम्यान कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेशी संबंध लावण्याजोगे कारणामुळे मृत्यू झाल्यास - रक्कम रु.५०,०००/- ३) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया असफल झाल्यास - रक्कम रु.३०,०००/- ४) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करतेवेळी गुंतागुंत झाल्यास किंवा कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाल्यानंतर डिस्चार्ज दिल्यानंतर ६० दिवसांच्या कालावधीत कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेशी संबंध लावण्याजोग्या कारणामुळे गुंतागुंत झाल्यास - प्रत्यक्ष खर्च परंतु रु.२५,०००/- च्या मर्यादेपर्यंत. ५) कुटुंब नियोजन सेवा पुरविणारे डॉक्टस व शासकीय संस्था / स्थानीक स्वराज्य संस्था, ॲक्रिडेट केलेले खाजगी रुग्णालय यांचेसाठी इन्डेंमिटी प्रती डॉक्टर / संस्था प्रती वर्ष ४ प्रकरणांच्या		उल्लेख असावा. २) कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर असफलता- संबंधित नोडल आधिकारी यांनी साक्षांकित केलेले क्लेम फॉर्म, संमंतीपत्र, शस्त्रक्रिया प्रमाणपत्र, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया असफलतेचे निदान करणारा प्रयोगशाळा तपासणी अहवाल. ३) कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर गुंतागुंत - संबंधित नोडल अधिकारी यांनी साक्षांकित केलेला क्लेम फॉर्म, संमतीपत्र, गुंतागुंतीनंतर झालेले उपचार दर्शविणारे केसपेपर्स, प्रिस्क्रिप्शन्स औषधे खरेदीच्या मूळ पावत्या.			

		मर्यादेत - रु.२,००,०००/- प्रती प्रकरणाच्या मर्यादेत. तसेच कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमुळे होणारे मृत्यू, गुंतागुंत व असफल शस्त्रक्रिया प्रकरणी लाभार्थ्यास केंद्र शासनामार्फत कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजनेअंतर्गत देण्यात येणा-या लाभा इतकाच लाभ (केंद्र शासनाकडील मापदंडानुसार) राज्य शासनाच्या निधीमधुन देण्याबाबतचे मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे आदेश आहेत व त्यानुसार सन २०१६.-१७ पासुनच्या प्रकरणांतील लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या निधीतुनही लाभ देण्याकरीता २२११ १४६८ या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद करुन अनुदान वितरीत करण्यात येते.					

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
८.	"प्रधानमंत्री मातृ वंदना योजना"	कुटुंबातील पहिल्या जिवीत अपत्यासाठी गर्भवती माता व स्तनदा मातांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे. (वेतनासह मातृत्व रजा मिळणा-या महिलांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही) या योजनेअंतर्गत गर्भवती माता व स्तनदा मातांना रु.५०००/- ची रक्कम ३ टप्प्यांमध्ये (काही निकष पूर्ण केलेनंतर) थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केला जातो.	राज्यातील सर्व शासकिय आरोग्य संस्था (ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे)	माता आणि बाल सुरक्षा कार्ड,लाभार्थी आणि तिच्या पतीच्या आधार कार्डची झेरॉक्स, लाभार्थीच्या स्वतंत्र बँक पासबुकची झेरॉक्स आणि नवजात बालकाचे जन्मनोंदणी प्रमाणपत्र	फॉर्म नोंदणी आणि कागदपत्रांची पूर्तता झालेनंतर लाभार्थीची माहिती केंद्र शासनाच्या पोर्टलवर भरलेनंतर किमान ३० दिवसांच्या आत लाभार्थींच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा केली जाते.	ग्रामीण भागाकरीता वैद्यकिय आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र व तालुका वैद्यकिय अधिकारी शहरी भागाकरीता वैद्यकिय आरोग्य अधिकारी, शहरी आरोग्य केंद्रे, महानगरपालिका व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगरपंचायत/ नगरपरिषद	ग्रामीण कार्यक्षेत्राकरीता जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद व शहरी कार्यक्षेत्राकरीता वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका मुंबई मनपा करीता कार्यकारी आरोग्य अधिकारी जिल्हाधिकारी

४.२ स्त्री हत्या रोखण्यासाठी प्रसवपूर्व निदानतंत्र (लिग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४

१) गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंगनिदान प्रतिबंध कायदा अधिनियम २००३ अन्वये गर्भधारणेपूर्वी व प्रसूतीपूर्वी गर्भाच्या लिंग तपासणीस व निवडीस प्रतिबंध असून त्यासाठी उपलब्ध तंत्रज्ञानाचा गैरवापर करण्यास मज्जाव करतो. जेणेकरुन गर्भलिंग निदान व निवड करुन, गर्भ मूलीचा आहे म्हणून गर्भपात होऊ नये, यासाठी प्रयत्न करतो.

२) गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा अधिनियम २००३ अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई शासन अधिसूचना क्र.प्रचिनी २००६/४२३/प्र.क्र.१५०/कु.क./२, दि. ५/३/२०११ अन्वये अधिक्रमीत करुन महाराष्ट्र शासन उक्त अधिनियमाखाली दिलेली पार पाडण्यासाठी राज्य पर्यवेक्षकीय मंडळाची स्थापना करण्यात आली.

३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन अधिसूचना क्र.प्राचिनी २०११/प्र.क्र.९४/कु.क.-२, दि.२६/७/२०११ अन्वये आयुक्त (कुटुंब कल्याण) तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई यांना राज्य समुचित प्राधिकारी म्हणून नियूक्त करण्यात आलेले आहे.

४) गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारीत २००३ (पीसीपीएनडीटी) अन्वये कायदयातील तरतूदीचे उल्लंघन करणा-या विरुध्द फौजदारी गुन्हे समुचित प्राधिकारी यांचे मार्फतीने न्यायालयात दाखल करण्यात येतात. तसेच गर्भलिंग निदान करुन स्त्री भृण हत्या करणा-या वैदयकीय व्यवसायीक दोषी आढळल्यास कायदयातील कलम २३ (१) अन्वये प्रथम गुन्हयांस तीन वर्ष सक्षम कारावासाची शिक्षा व १०,०००/- (दहा हजार रुपये) दंड व पुन्हादोषी आढळल्यास पाच वर्षे सक्षम कारावासाची शिक्षा व ५०,०००/- (पन्नास हजार रुपये) दंड आकारण्याचे कायदयामध्ये तरतूद आहे.

५) राज्यातील स्त्री-भृण हत्या रोखण्यासाठी प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग नि वडीस प्रतिबंध) कायदा (पीसीपीएनडीटी) अंतर्गत राज्यामध्ये सोनोग्राफी बनविणा-या व विक्री करणा-या कंपन्या राज्य समुचित प्राधिकारी यांचेंकडे नोंदणी कराण्याची सक्ती शासन क्र . प्रचिनी २००६/कु.क., दि.७.८.२०१२ रोजी निर्णयाअन्वये करण्यात आली आहे.

६) पीसीएनडीटी अंतर्गत नागरीकांना राज्यात तक्रार नोंदविण्यासाठी टोल फ्री क्र.१८००२३३४४७५ जाहिर करण्यात आला असून www.amchimulgi.gov.in हे संकेतस्थळी कार्यान्वित करण्यात आले आहे. यात नोंदविलेल्या सर्व तक्रारीचे निराकरण करण्यात येते.

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
नागरिकांची सनद - कार्यपूर्तीचे वेळापत्रक

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
९.	अ) राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम	मैत्री क्लिनीकमध्ये किशोरवयीन आरोग्य कार्यक्रम अंतर्गत १० ते १९ वर्ष वयोगटातील मुला-मुलींना खालील प्रमाणे सेवा पुरविल्या जातात. • आरोग्याविषयी समुपदेशन व मार्गदर्शन केले जोते. • या क्लिनीक्समार्पुत मासीक पाळीमध्ये उद्भवणाऱ्या समस्या. • आर.टी.आय. एस.टी.आय., त्वचेच्या समस्या, प्रतिबंधक उपायांबाबत (ओ.सी.पील्स., ई.सी.पील्स.,आय.यु.डी) बाबत समुपदेशन केले जाते.	राज्यातील ३४ जिल्ह्यातील मैत्री क्लिनीक -जिल्हा सामान्य रुग्णालये, व १४ अति जोखमीच्या जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये स्त्री रुग्णालये, वैद्यकिय महाविद्यालयांमध्ये, शहरी भागात व काही प्रा.आ.केंद्रात स्थापन करण्यात आलेली आहेत.	लागू नाही	लागू नाही	कार्यक्षेत्रातील संबंधित वैद्यकीय अधिकारी व समुपदेशक	जिल्हा शल्य चिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
	ब) मासिक पाळी स्वच्छता संवर्धन योजना	मासिक पाळीमधील स्वच्छता संवर्धन योजना राज्याच्या ग्रामीण भागामध्ये १० ते १९ वर्षाच्या किशोरवयीन मुलींसाठी निश्चित करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींना अत्यल्प दरात सॅनिटरी नॅपकीन गावपातळीवर आशामार्फत उपलब्ध करुन देण्यात येते .	प्राथमिक आरोग्य केंद्र	लागू नाही	लागू नाही	कार्यक्षेत्रातील आशा	जिल्हा आरोग्य अधिकारी
	क) विकली आर्यन फॉलिक ऑसीड सप्लीमेंन्टेशन योजना.	सन २०१२-१३ वर्षापासून राज्यात विकली आर्यन फॉलिक ऑसीड सप्लीमेंन्टेशन योजना कार्यान्वित आहे सदर योजने अंतर्गत महिन्याच्या दर सोमवारी इयत्ता ६ वी ते १२ मधील मुला-मुलींना तसेच शाळेत न जाणा-या मुलींना महिन्याच्या दर सोमवारी लोह व फॉलीक ऑसीडची १ गोळी असे ५२ आठवडे एका वर्षातून देण्यात येतात आहे.	राज्यातील ३४ जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालये- ग्रामिण रुग्णालय - उपजिल्हा रुग्णालय, शाळा , अंगणवाडी	लागू नाही	लागू नाही	कार्यक्षेत्रातील वैद्यकीय अधिकारी ,अंगणवाडी सेविका ,आरोग्य सेविका ,आशा तसेच शाळेतील शिक्षक	जिल्हा शल्य चिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
१०.	प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान (पी.एम.एस.एम.ए.)	प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाचे आयोजन दर महिन्याच्या ९ तारखेला व ९ तारखेला रविवार किंवा सुट्टी असेल तर त्या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी राबविण्यात येते. "प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान" अंतर्गत खालील सेवा देण्यात येतात. ✓ मोफत प्रयोगशाळा चाचण्या. ✓ लाभार्थीचा वैद्यकीय पुर्वइतिहास घेऊन तपासणी करुन व धोक्याची लक्षणे, गुंतागुंत व कोणतीही जोखीम नसल्याची खात्री करण्यात येते.	संबंधीत सर्व शासकीय आरोग्य संस्था (प्रा.आ.केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, सामान्य रुग्णालये, जिल्हा रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालये,	काही नाही	• गरोदरपणाच्या काळात तपासणी, समुपदेशन, प्रयोगशाळा चाचण्या व औषध वाटप. सोनोग्राफी	संबंधीत वैद्यकीय अधिकारी / स्त्रीरोग तज्ञ	राज्यस्तरावर - राज्य आरोग्य सोसायटी संबंधित तक्रार निवारण अधिकारी जिल्हास्तरावर- जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील प्रशासकीय अधिकारी

		✓ प्रसुती पूर्व तपासणीसाठी आलेल्या लाभार्थीचा रक्तदाब, पोटावरुन तपासणी व गर्भपिंडाच्या हदयाचे ठोके तपासतात. ✓ शोधलेल्या सर्व अतिजोखमीच्या मातांना उच्च संस्थेमध्ये पुढील उपचारासाठी संदर्भीत केले जाते ✓ आणि जननी शिशु सुरक्षा संस्थामध्ये कार्यक्रमांअंतर्गत उच्च संस्थेमध्ये योग्य ते उपचार दिले जातात. सर्व लाभार्थ्याला एमसीपीकार्ड देण्यात येते.					

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुण
नागरिकांची सनद - कार्यपूर्तीचे वेळापत्रक

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
	ॲनिमिया मुक्त भारत	• केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार ६ महिने ते ५९ महिने या वयोगटातील व ५ वर्षे ते ९ वर्षे वयोगटातील बालकांना, किशोरवयीन मुला – मुलींना (१० ते १९ वर्ष), प्रजननक्षम महिला, गरोदर माता, स्तनदा माता यांना आयर्न फॉलिक ॲसिडची औषधी पुरकमात्रा देण्यात येते. • ६ महिने ते ५ वर्षातील बालकांना आठवडयातून दोनदा आयएएफ सिरप आणि ५ वर्षे ते ९ वर्षाच्या बालकांना आठवडयातून एकदा आयएएफ टॅबलेट	गृहस्तर, सरकारी शाळा व निमसरकारी शाळा, आरोग्य संस्था, अंगणवाडी, ग्राम आरोग्य स्वच्छता पोषण दिवस,	लागु नाही	लागु नाही.	आशा कार्यकर्ती, आरोग्य सेविका , स्टाफ नर्स, वैद्यकिय अधिकारी,	जिल्हा आरोग्य अधिकारी

अ.क्र	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी व सेवेचा प्रकार	सेवा मिळावयाचे ठिकाण	सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहीत कागदपत्रे	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल	सेवा पुरविणारा अधिकारी व दालन	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी.
१	२	३	४	५	६	७	८
		(गुलाबी गोळी), किशोरवयीन मुला – मुलींना (१० ते १९ वर्ष) (निळी गोळी) आठवडयातून एकदा, प्रजननक्षम महिला, गरोदर माता व स्तनदा माता यांना (लाल गोळी) आठवडयातून एकदा आयर्न फॉलिक ॲसिडची औषधी पुरकमात्रा देण्यात येते. • तसेच योग्य प्रकारे सर्व वयोगटातील लाभार्थ्यांमधील रक्तक्षयाचा शोध घेऊन उपचार देणे हा या योजनेचा भाग आहे.					

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे

वर्ग-१

अ क्र	अतिरिक्त संचालक (कुटुंब कल्याण)	सहसंचालक (कुटुंब कल्याण)	उपसंचालक (कुटुंब कल्याण)	उपसंचालक (विलटो)	संशोधन अधिकारी	सहायक संचालक (कुटुंब कल्याण)	लोकसंख्या शास्त्रज्ञ	मुख्य प्रशासकीय अधिकारी
	विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविणे व सनियंत्रण ठेवणे, अनुदान वितरण नियंत्रण अधिकारी म्हणून आर्थिक बाबींवर नियंत्रण ठेवणे देयकांवर प्रतिस्वाक्षरी करणे.	अतिरिक्त संचालक (कुटुंब कल्याण), पुणे यांच्या अधिनस्त कार्य करतील. अतिरिक्त संचालक यांनी त्यांना नेमून दिलेल्या कामाच्या अधिन राहून काम पाहतील.	आरसीएच कार्यक्रमाअंतर्गत या कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमाचे अतिरिक्त संचालक व सहसंचालक यांच्या सुचनेप्रमाणे कामे पाहतील.	नियमित लसीकरण कार्यक्रम राज्यामध्ये राबविण्याबाबत अतिरिक्त संचालक व सहसंचालक यांनी नेमून दिलेल्या सूचनेनुसार काम पाहतील.	उपसंचालक (विलटो) यांनी दिलेल्या सुचनेनुसार नियमित लसीकरण कार्यक्रमाचे संनियंत्रण करणे, पल्स पोलिओ लसीकरण कार्यक्रम राबविणे, इ.	अतिरिक्त संचालक व सहसंचालक यांचे सुचनेनुसार खालील कार्यक्रमावर संनियंत्रण ठेवण्याचे काम करणे, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत विहित योजनेचे संनियंत्रण करणे, माता आरोग्य, जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा योजना, बाल आरोग्य कार्यक्रम, कुटुंब कल्याण कार्यक्रम इ. आवश्यकतेनुसार क्षेत्रिय स्तरावर भेटी देवून कार्यक्रमाची पाहाणी करणे व तसा अहवाल सादर करणे.	लोकसंख्या विषयक सर्व बाबींवर केलेल्या कामाचा अहवाल वरिष्ठांना सादर करणे, योग्य जोडपी सर्वेक्षण, सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना सर्व कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्राप्त होणारी आकडेवारी अदयावत ठेवणे, मासिक अहवाल तयार करणे, प्राप्त झालेल्या आकडेवारीचा गुणात्मक दर्जा तपासून सर्व जिल्हयाना फिडबॅक देणे, राज्यातील प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत जिल्हास्तरीय कृती योजना बाबत मार्गदर्शन करणे. कार्यक्रमाच्या अमंलबजावणीसाठी वार्षिक अपेक्षित पातळी निश्चित करणे,	आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहाणे. वेतन/भनिनि/अग्रिमे/ निवत्ती वेतन इत्यादी सर्व देयकावर स्वाक्षरी करणे, रोख व्यवहार सांभाळणे, आस्थापना विषयक सर्व बाबीवर नियंत्रण ठेऊन कार्यवाही करणे, अनुदान वितरणेबाबत लेखाधिकारी यांना सुचना देणे, लेखा परिक्षणाबाबत भांडार पडताळणी अधिकारी यांना वेळोवेळी सुचना देणे.

वर्ग - २

अ क्र	लेखाधिकारी	भांडार अधिकारी	भांडार पडताळणी अधिकारी	आरोग्य साधन सामुग्री देखभाल अधिकारी	सांख्यिकी अधिकारी	स्विय सहाययक
	कुटुंब कल्याण कार्यक्रमाच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान क्षेत्रिय कार्यालयाच्या मागणी नुसार वितरीत करणे, त्या अनुषंगाने कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करुन शासनास सादर करणे.	कुटुंब कल्याण व इतर कार्यक्रमांतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणारी आवश्यक साहित्य सामुग्री, संतती प्रतिबंधक औषधे व साहित्य इत्यादीची क्षेत्रिय कार्यालयाने मागणी केल्याप्रमाणे पुरवठा करणे तसेच केंद्र व राज्य शासनास औषधे व साहित्यासाठी पाठपुरावा करुन घेणे.	मुख्य लेखाशिर्ष २२११ कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत वितरीत केलेल्या अनुदानातून खरेदी करण्यात आलेल्या औषधे व साधन सामुग्रीची भांडारपडताळणी करणे, तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या पुरवठा करण्यात आलेल्या साहित्य सामुग्रीचे भांडारपडताळणी/ लेखा परिक्षण करणे.	उपसंचालक विलटो, यांचे सुचनेनुसार राज्यातील सर्व जिल्हयात व प्राथमिक आरोग्य केंद्रात शितसाखळी विकसीत करणे, कार्यक्रमातंर्गत राज्यातील व जिल्हयातील शित गृह, शित पेटया इतर शित साखळी सामुग्री, दुरुस्ती देखभाल करणे, शित साखळी उपकरणे अद्यावत ठेवणे, शित साखळीचे कार्य प्रभावीपणे राबविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करणे, इ.	लोकसंख्या शास्त्रज्ञ यांच्या सुचनेनुसार कुटुंब कल्याण कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या आरोग्य विषयक कार्यक्रमाचे व्यवस्थापन माहिती पध्दती अहवाल (एम.आय.एस.) तयार करुन घेणे, अहवालच्या आकडेवारी संदर्भात सर्व जिल्हयाचा पाठपुरावा करणे, कार्यक्रमाविषयक उदिद्ष्ट ठरवणे त्यासाठी विविध निकषांची तपासणी करणे, सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना,	अतिरिक्त संचालक यांचे श्रुतलेखन घेणे, समन्वय साधणे, व त्यांचे सुचनेनुसार दुरध्वनी संदेश / इ-मेल इत्यादीबाबत कार्यवाही करणे.

परिशिष्ट-२

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे

नागरिकांची सनद - कार्यपूर्तीचे वेळापत्रक

कार्यासन क्रमांक	कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा	आवश्यक कागदपत्रांची पूर्तता किती कालावधीत सेवा पुरविली जाते.	सेवा पुरविणारा अधिकारी कर्मचारी (दालन क्रमांक दुरध्वनी विस्तार क्रमांक)	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक
सेल कक्ष-१	अतिरिक्त संचालक, सहसंचालक, उपसंचालक यांनी दिलेले श्रुतलेखन विविध कार्यक्रमा संबंधित घेण्यात येणारे बैठकांचे इतिवृत्त अतिरिक्त संचालक, सहसंचालक यांनी दिलेल्या सुचना नुसार राज्य / केंद्र शासनास पत्रव्यवहार करणे इ.	-	-	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
आस्थापना कक्ष-२	कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवाविषयक सर्व बाबी रजा, सेवानिवृत्तीवेतन याबाबत पत्रव्यवहार.	नियमानुसार	मुख्य प्रशासकीय अधिकारी तळमजला बी-३ २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
रोख शाखा कक्ष-३	कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन भविष्य निर्वाह निधी, प्रवास देयक व इतर देयक काम.	नियमानुसार	मुख्य प्रशासकीय अधिकारी तळमजला बी-३ २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९

कार्यासन क्रमांक	कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता किती कालावधीत सेवा पुरविली जाते.	सेवा पुरविणारा अधिकारी कर्मचारी (दालन क्रमांक दुरध्वनी विस्तार क्रमांक)	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक
अर्थ संकल्प कक्ष-४	कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचे प्राप्त अनुदान मागणी प्रमाणे वितरण करणे, अंदाजपत्रके तयार करुन शासनास पाठविणे.	नियमानुसार	मुख्य प्रशासकीय अधिकारी तळमजला बी-३ २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
सहायक अनुदान कक्ष-५	महानगरपालिका, नगरपालिका अंतर्गत स्वयंसेवी संस्था यांना त्यांचे मागणी व कामाचे अनुषंगाने अनुदान वितरण करणे, आवश्यकतेनुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये भेटी देणे.	नियमानुसार	सहाययक संचालक पहिला मजला बी-१० २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
भांडार कक्ष-६	केंद्र / राज्य शासनाकडून प्राप्त झालेली साहित्य सामुग्री मागणी प्रमाणे राज्यातील क्षेत्रिय कार्यालयांना वितरण करणे.	नियमानुसार	भांडार अधिकारी २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
दक्षता कक्ष-८	कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया नंतर होणार मृत्यु , गुंतागुंत व असफल प्रकरण् संबंधित नुकसान भरपाई, तक्रारी, विभागीय चौकशी इ.बाबतचे काम.	नियमानुसार	सहायक संचालक पहिला मजला बी-१० २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९

कार्यासन क्रमांक	कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता किती कालावधीत सेवा पुरविली जाते.	सेवा पुरविणारा अधिकारी कर्मचारी (दालन क्रमांक दुरध्वनी विस्तार क्रमांक)	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक
पीसीपीएनडीटी कक्ष-८ ड	पीसीपीएनडी अंतर्गत खर्चास मंजूरी सोनोग्राफी केंद्राची आकडेवारी अद्यावत करणे.	-	सहायक संचालक पहिला मजला बी-१६ २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
लोकसंख्या व मुल्यमापन कक्ष-९	आरोग्य व्यवस्थापन व माहिती पध्दतीतंर्गत प्राप्त होणा-या सर्व निर्देशांकांचे अहवाल उपलब्ध करणे, सावित्री फुले कन्या कल्याण योजनेच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे	-	लोकसंख्या शास्त्रज्ञ दुसरा मजला २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
नवसंजीवनी योजना (आदिवासी जिल्हयांसाठी) कक्ष-१० अ	नवसंजिवनी योजना, कुपोषण आणि माता मृत्यु इत्यादी.	-	सहायक संचालक पहिला मजला बी-१६ २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९

कार्यासन क्रमांक	कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता किती कालावधीत सेवा पुरविली जाते.	सेवा पुरविणारा अधिकारी कर्मचारी (दालन क्रमांक दुरध्वनी विस्तार क्रमांक)	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक
माता आरोग्य, कक्ष-१० ब	जननी सुरक्षा योजना - राज्य स्तरिय सनियंत्रण	-	सहाय्यक संचालक पहिला मजला बी-१६ २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
	जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम - राज्य स्तरिय सनियंत्रण			
	प्रधान मंत्री सुरक्षित मातृत्व अभियान प्रधानमंत्री मातृवंदना योजना			
भांडार पडताळणी कक्ष-११	केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणा-या औषध साहित्याची क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर जाऊन पडताळणी करणे.	-	भांडार अधिकारी २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
नियमित लसीकरण कक्ष-१२	नियमित लसीकरण कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, याबरोबर केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या पल्स पोलिओ लसीकरण मोहिम व मिशन इंद्रधनुष या मोहिमेची अंमलबजाणी करणे, विविध लसींची वार्षिक तसेच मोहिमे करिता लागणा-या लस साठयांची माहिती केंद्र शासनाकडे नोंदविणे, सर्व जिल्हयाना देण्यात आलेली कामाची वार्षिक अपेक्षित पातळी पुर्ण करण्यासाठी पाठपुरावा करणे, सर्व जिल्हयाना आवश्यक असलेला लसींचा साठा वेळोवेळी पुरविणे	-	उपसंचालक (विलटो) तळमजला २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९

कार्यासन क्रमांक	कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता किती कालावधीत सेवा पुरविली जाते.	सेवा पुरविणारा अधिकारी कर्मचारी (दालन क्रमांक दुरध्वनी विस्तार क्रमांक)	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक
शित साखळी कक्ष-१३	शीतसाखळी अद्यावत ठेवणे, क्षेत्रिय कार्यालयाकडून शीतसाखळी संबंधित माहिती प्राप्त करुन त्या प्रमाणे एडी-सिरींजेस वितरण करणे.	-	संशोधन अधिकारी तळमजला २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
प्रशिक्षण कक्ष-१४	प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाशी निगडीत विविध संर्वगासाठी आवश्यक प्रशिक्षण आयोजित करणे, जिल्हास्तरावर आयोजित केलेल्या प्रशिक्षणांचे सनियंत्रण करणे.	-	सहाय्यक संचालक तळमजला २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
एफ.एम.जी. कक्ष-१५	केंद्र शासनाकडून राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्राप्त होणा-या अनुदानाचे जिल्हास्तरावर वितरण करणे. राज्यस्तरावरील होणा-या खर्चाचे सनियंत्रण करणे. करार तत्वावरील अधिकारी/ कर्मचारी वेतन/मानधन सेवाविषयक बाबी हताळणे.	-	उपसंचालक, कुटुंब कल्याण तळमजला बी-११ २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
बाल आरोग्य कक्ष-१५ क	बाल आरोग्य कार्यक्रमातर्गत राबविण्यात येणा-या विविध योजनाचे संनियंत्रण, जीवनसत्व अ व जंतनाशक मोहिमेबाबत संनियंत्रण, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाचे संनियत्रण	-	सहायक संचालक तळमजला बी-५ २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९

कार्यासन क्रमांक	कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा	आवश्यक कागदपत्रांची पुर्तता किती कालावधीत सेवा पुरविली जाते.	सेवा पुरविणारा अधिकारी कर्मचारी (दालन क्रमांक दुरध्वनी विस्तार क्रमांक)	सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक
रचना कार्यपध्दती कक्ष-१६अ	कार्यालयीन इमारतीची देखभाल, दुरुस्ती विविध कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणारे अनुदानातून कार्यालयास लागणारी स्टेशनरी विविध मार्गाचा अवंलब करुन खरेदी करणे, कार्यालयाचे दुरध्वनी, वीज, पाणी देयकांच्या नोंदी करणे.	नियमानुसार	मुख्य प्रशासकीय अधिकारी तळमजला बी-३ २६०५८१३९ २६०५८७३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९
अधिवेशन संबंधित कक्ष-१६ब	विधान सभा / परिषद लक्षवेधी सुचना इ.	-	मुख्य प्रशासकीय अधिकारी तळमजला बी-३ २६०५८१३९	अतिरिक्त संचालक २६०५८१३९